# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क्र.म.वि. 3365 C/720
दिनांक:- 27/8/08

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
विद्या शिक्षण प्रसारक मंडळ,
व्दारा :- व्हि.एस.पी.एम.कॉलेज ऑफ एज्युकेशन,
खुटांबा, काटोल, जि.नागपूर.

विषय :- सत्र 2008-09 पासुन नविन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- 1. शासन पत्र क. बी.एड.-2008 / (13 / 08) / मशि-1, दि. 04 एप्रील, 2008.
2. एन.सी.टी.ई.चे दिनांक 07-12-2007 चे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित पत्रानूसार राज्य शासनाने व एन.सी.टी.ई. ने आपल्या संस्थेला सत्र 2008-09 पासुन बी.एड. अभ्यासक्रमाचे नविन अध्यापक महाविद्यालय सुरु करण्यास दिलेल्या परवानगीनूसार व स्थानिय चौकशी समितीने केलेल्या शिफारशीनुसार विव्दत परिषदेच्या वतीने मा.कुलगुरुंनी म.वि.अधिनियम 1994 च्या कलम 14(7) अंतर्गत नविन महाविद्यालयास सत्र 2008-09 पासुन खालीलप्रमाणे प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

| संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव व ठिकाण | विद्याशाखा / अभ्यासकम | विद्यार्थी संख्येचे निकष |
|---|---|---|---|
| विद्या शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर. | व्हि.एस.पी.एम.कॉलेज ऑफ एज्युकेशन, खुटांबा, काटोल, जि.नागपूर. | शिक्षण विद्याशाखा<br>बी.एड. (मराठी माध्यम) | 100 विद्यार्थी |

**प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन देण्यात येत आहे.**

1. उपरोक्त नविन महाविद्यालयाला देण्यात आलेले प्रथम संलग्निकरण विद्यापीठाव्दारे गठीत करण्यात येणाऱ्या स्थानिय चौकशी समितीच्या शिफारशीच्या अधिनस्त राहून देण्यात आले आहे.
2. एन.सी.टी.ई ने दिलेल्या परवानगीत घातलेल्या अटींची पुर्तता करण्यात यावी.
3. उपरोक्त महाविद्यालय कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास आपले महाविद्यालय तयार असून त्या आशयाचे हमीपत्र महाविद्यालयाने विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर यांना सादर करण्याचे अटीवर ही मान्यता देण्यात येत आहे.
4. या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या आर्थिक बाबी संबंधी सर्वस्वी जबाबदारी स्विकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.
5. कायम विना अनुदान तत्वावर संस्थेस महाविद्यालय आर्थिकदृष्टया चालविणे शक्य व्हावे यासाठी संस्थेने विद्यार्थ्यांकडून किती शुल्क आकारावे हे राज्याच्या शिक्षण शुल्क समितीकडून ठरवून घ्यावे.
6. शासनाने मान्यता दिलेल्या अभ्यासकमांपैकी ज्या अभ्यासकमांना राज्य शासना मार्फत केंद्रिकृत प्रवेश पध्दतीने प्रवेश दिले जातात अशा अभ्यासकमासाठी चालू वर्षासाठी प्रकिया पूर्ण झाली असल्यास ते अभ्यासकम पुढील वर्षापासून संबंधित महाविद्यालयांनी सुरु करावेत.

कृपया कळावे.

आपला,

( फु. ख. भगत ),
सहायक कुलसचिव (म.वि.)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,नागपूर विद्यापीठ

प्रतिलिपी माहितीकरिता सादर:-

1. संचालक उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे.
2. सहसंचालक, (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,नागपूर
3. संचालक (बी.सी.यु.डी.)
4. वित्त व लेखा अधिकारी.
5. परिक्षा नियंत्रक,
6. उपकुलसचिव विद्या विभाग,
7. सहायक कुलसचिव, परिक्षा विभाग, गोपनिय विभाग,व्यावसायिक परिक्षा,परिक्षा व चौकशी
8. संबंधित लिपीक, शिक्षक मान्यता,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर